## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय ,अमरावती.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात अमरावती येथे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर समारोप कार्यक्रम संपन्न

**<u>कार्यक्रम अहवाल</u>**

दिनांक:-**दि. 5 ते 25 मे 2022**

स्थानिक : श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात अमरावती द्वारा आयोजित उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन **दि. 5 ते 25 मे 2022**दरम्यान दोन सत्रात करण्यात आले होते सदर शिबिरा मध्ये 6 ते 25 या वयोगटातील अनेक स्थानिक शाळेकरी खेळाडू विद्यार्थीनी सहभाग घेतला या शिबारामध्ये योगा ,कबड्डी, ज्यूदो, स्विमिंग, ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, तायक्वांन्दो

, जिम्नॅस्टिक, बॅडमिंटन, क्रिकेट, एरोबिक्स, खो-खो, व्हॉलीबॉल, फूटबॉल

वविशेष मनोरंजनात्मक उपक्रम--- रेनडान्स । झुंबा । लोकनृत्य सारख्या अनेक खेळाचे व उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले त्यानुसार दिनांक 26 मे 2022 रोजी उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा समारोपीय कार्यक्रम महाविद्यालयामध्ये संपन्न झाला उपरोक्त कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून प्रा.हेमंत मोहोड तसेच स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. पुष्पलता देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांनी सर्वप्रथम शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन , दीपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण केले

त्यानंतर डॉ. पुष्पलता देशमुख मॅडम यांनी प्रास्ताविक भाषण केले यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात मध्ये संपूर्ण शिबिरा मध्ये घेण्यात आलेल्या खेळ प्रकार व उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली तसेच विविध खेळांमध्ये कोणकोणत्या तज्ञ क्रीडा मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केलं याची माहिती सांगितली त्यानंतर शिबिरार्थी कु. नित्या राजीव देवडिया, हर्षल विजय डांगे , रंजीत दिनेश व्यास या विद्यार्थ्यांनी शिबिरांमध्ये घेतलेल्या खेळ प्रकार उपक्रमाबद्दल विषयी आपले अनुभव सांगत मनोगत व्यक्त केले. याच बरोबर श्री राजीव देवडिया या पालकांनी सुद्धा याप्रसंगी त्यांचे मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर प्रमुख अतिथी प्रा. हेमंत मोहोड यांनी आपल्या मनोगनात महाविद्यालयांमध्ये विविध खेळा संबंधित कोर्सेस सुरू केल्यास अनेक खेळाडूंना संधी मिळेल असे प्रतिपादन केले त्यानंतर अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंजली ठाकरे यांनी

Scanned with OKEN Scanner

याप्रसंगी मार्गदर्शन करताना विद्यार्थी खेळाडूंसाठी घेतलेल्या या क्रीडा प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मैदानाची व खेळाची आवड निर्माण होणे व स्व विकास करून घेणे अभिप्रेत होते आणि ते या ठिकाणी त्यांनी मिळवले आहे असे दिसून येत आहे असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले त्याचप्रमाणे खेळाचे महत्व मानवी जीवनात अत्यंत उपयुक्त असून व वर्तमानात खेळाला करिअर म्हणून अवलंबण्यात यावे असे आव्हान उपस्थित पालकांना केले

त्यानंतर लगेचच शिबिरार्थी सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सहभागी प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देण्यात आले
सदर कार्यक्रमाचे संचालन प्रा. जितेंद्र राऊत व आभार प्रदर्शन डॉ. सरोजनी उंबरकर यांनी केले कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व शिबिरार्थी विद्यार्थ्यांना व त्यांच्या सोबत आलेल्या पालकांना अल्पोपहार देऊन याश्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात अमरावती येथे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर समारोप कार्यक्रम संपन्न

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय
अमरावती

PRINCIPAL
Shri Shivaji College of Physical Education

Shri Shivaji College of Physical Education
Amravati

**श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय ,अमरावती.**

**शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 57 व्या पुण्यतिथी निमित्त्याने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे बळीराजा आत्मसन्मान दौड संपन्न**

**<u>कार्यक्रम अहवाल</u>**

दिनांक:-10/04/2022

स्थानिक:-शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 57 व्या पुण्यतिथी निमित्त्यानेश्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, व श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिकशाळा ,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने बळीराजा आत्मसन्मान दौड चे आयोजन करण्यातआले होते त्यानुसार ही दौडदिनांक **10 एप्रिल २०२२**रोजी सकाळी 7 वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथून सुरू झालीव संपन्न झाली

यास्पर्धेचे उद्घाटनसमारंभाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानीमा. ॲड. गजाननराव पुंडकर उपाध्यक्ष श्री शिवाजीशिक्षण संस्था अमरावती तसेचउद्घाटकम्हणून मा. श्री हेमंत भाऊ काळमेघ सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, त्याचप्रमाणेप्रमुख अतिथीम्हणून मा. श्री नरेशपाटील स्वीकृत सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, तसेच बळीराजा दौंडचे आयोजक श्री शिवाजी शारीरिकशिक्षण महाविद्यालय अमरावती चे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे वश्री शिवाजी बहुउद्देशीयउच्च माध्यमिक शाळा ,अमरावती चे मुख्याध्यापक श्री सुधीर माळवेउपस्थित होते.

सदरबळीराजा आत्मसन्मान दौड च्या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुखयांच्या प्रतिमेचे पूजन व प्रतिमेला हारर्पण करूनझाली त्यानंतर लगेचच उपस्थित मान्यवरांचे स्वागत फुल गुच्छ देऊन करण्यात आले त्यानंतरकार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शिवाजी संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर यांच्या व उपस्थित मान्यवरांच्याहस्ते व सामूहिक क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले त्यानंतर श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविद्यालय अमरावती ची विद्यार्थीकुमारीश्रुती प्रकाशराव बडेरे नी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा मध्ये मल्लखांब या क्रीडाप्रकारात पदक प्राप्त करून तिचीप्रतिष्ठेच्याखेलो इंडिया या स्पर्धेसाठी निवड झाल्यामुळे उपस्थितमान्यवरांच्या हस्ते तिचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला त्यानंतर उद्घाटक श्रीशिवाजी शिक्षण संस्था चे सदस्य मा. श्री हेमंत भाऊ काळमेघ यांनी बळीराजा आत्मसन्मानदौड ची सुरुवात हिरवी झेंडी दाखवून केली

Scanned with OKEN Scanner

सदरबळीराजा आत्मसन्मान दौड मध्ये आंतर महाविद्यालयीन व शाळेचे 400 हून अधिक खेळाडू विद्यार्थ्यांनीसहभाग घेतला त्यामध्ये पुरुष वर्ग व महिला वर्ग जुनिअर गटासाठी 2 व सीनियर गटासाठी 3 किलोमीटर अशा पद्धतीचे आंतर पार करून दौडसंपन्न झाली

सदरदौड नंतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सन्माननीय मान्यवर यांच्या हस्ते सहभागी झाल्याचेप्रमाणपत्र देण्यात आले सदर बळीराजादौड याकार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्री संदीप इंगोले यांनी केले तसेच या बळीराजा आत्मसन्मान दौड च्यायशस्वीतेसाठी श्री शिवाजीशारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती व श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळाअमरावती च्या सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अतोनात परिश्रमघेऊन बळीराजा आत्मसन्मान दौडयशस्वीरित्या पार पाडली

PRINCIPAL
Shri Shivaji College of
Physical Education, Amravati

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय
अमरावती

Shri Shivaji College of Physical Education
Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय ,अमरावती.

## जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने भव्य दिव्य महिला बाईक रॅली चेयशस्वी आयोजन

**<u>कार्यक्रम अहवाल</u>**

दिनांक ०८/03/2022

स्थानिक :-आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपली भूमिकायोग्य पद्धतीने साकारणाऱ्या आपल्या आई, बहीण, पत्नी, मुलगी, मैत्रिण, शिक्षिका इत्यादींप्रती आभार व्यक्त करण्यासाठी आणि त्यांचागौरव, सन्मान करण्यासाठी श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, रोटरी क्लबऑफ अमरावती अंबानगरी व रोटरॅक्ट क्लब व बियाणी विज्ञान महाविद्यालय अमरावती च्या संयुक्तविद्यमानाने व अमरावती शहर पोलीस आयुक्तलय यांच्या सहकार्यानेमंगळवार ८ **मार्च** २०२२रोजी भव्य दिव्य बाईकरॅलीचे ,झुम्मा डान्स इव्हेन्ट व विशेष कार्यक्रमाचेआयोजन अमरावती पोलीस आयुक्त कार्यालय समोरील पोलीसग्राउंड वर करण्यात आले

त्यानुसार जागतिक महिलादिनानिमित्त सर्वप्रथमझुम्मा डान्स इव्हेन्ट चे आयोजन ट्रेनर श्री आशिषलुल्ला व टीम द्वारे आयोजन करण्यात आले त्यानंतर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यातआले

सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सन्माननीयपोलीस आयुक्तडॉ.आरती सिंह , तसेच प्रमुख उपस्थितीम्हणून श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती चे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे , रोटरी क्लबचे अध्यक्ष संकेत मोहता व सेक्रेटरी गौरव वानखडे व प्रोजेक्ट डायरेक्टरमोनाली ढोले ,श्री अतुल कोल्हे उपस्थित होते

सदरकार्यक्रमांमध्ये सन्माननीय मान्यवरांचे फुलगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतरकार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सन्माननीय पोलीस आयुक्तडॉ.आरती सिंह , यांनी याप्रसंगी मार्गदर्शनकरतांना उपस्थित महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छादिल्या जागतिक महिला दिन साजरा करणे हे काळाची गरज आहे

तसेचअमरावती शहरांमध्ये महिला सुरक्षित आहे महिलांची सुरक्षिता साठी संपूर्ण पोलीस दल सज्जआहे त्यामध्ये दामिनी पथक ,सायबर सेल, महिला सेल विभाग इत्यादींचासमावेश आहे असे प्रतिपादन केले व आजच्या कार्यक्रमाचेआयोजन संबंधित ज्यांनी नियोजन केले त्यांचे त्यांनी आभार मानले व अभिनंदन मॅडम नी केले

त्यानंतरसौं नंदा सोनवणे यांना लॉग जम्प या इव्हेंटमध्ये मध्ये गोल्ड मेडल मिळाल्यामुळे त्यांचासत्कार सन्माननीय पोलीस आयुक्तडॉ.आरती सिंहयांच्या हस्ते करण्यात आला

Scanned with OKEN Scanner

वरीलकार्यक्रमाचे संचालन डॉ. मोनाली ढोले , कु वैष्णवी इंगळे यांनी केले

त्यानंतरकार्यक्रमाच्या शेवटी संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्विता करता पोलीस निरीक्षक सीमा दातारकरपोलीस उपअधीक्षक पुनम पाटीलपोलीस निरीक्षकनीलेकर मॅडम यांचे आभार कार्यक्रमस्थळी मानले. त्यानंतर कु. मनाली जावेरी यांनी बाईकरॅलीच्या रूट बद्दलची माहिती दिली व पोलीस उपअधीक्षक पुनम पाटील यांनी बाईक रॅली संबंधीचीविशेष सूचना दिली.

त्यानंतरसन्माननीय पोलीस आयुक्तडॉ.आरती सिंह यांनीसदर बाईक रॅलीला हिरवा झेंडा दाखवूनरॅली चीसुरुवातझाली सदर रॅली ही पोलीस ग्राउंड वरून 2 किमी च्या मार्गावर आयोजित करण्यात आली

वरीलकार्यक्रमामध्ये मोठ्या संख्येने महिला व विद्यार्थिनी पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी, विविध संघटनेच्या पक्षाच्या पदाधिकारी ,रोटरी क्लबचे सदस्य व श्री शिवाजी शारीरिक शिक्षणमहाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

PRINCIPAL
Shri Shivaji College of Physical Education, Amravati

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविदयालय
अमरावती

Shri Shivaji College of Physical Education
Amravati

Scanned with OKEN Scanner

**श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय ,अमरावती.**

**श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावतीयेथे सन्मानजनक मृत्यू व पॅलिएटीव्ह केअर या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

## कार्यक्रम अहवाल

दिनांक 02/03/2022

स्थानिक:-श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती सोबत श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयअमरावती व रोटरी मिडटाऊन सुखांत पॅलिएटीव्ह केअर सेंटरच्या संयुक्त विद्यमानानेपॅलिएटीव्ह (उपशामक) सेवा जनजागृती अभियान अंतर्गतव्याख्यानांचे आयोजन महाविद्यालय येथे करण्यात आले

सदरकार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजलीठाकरे प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय आजीवन सदस्य माननीयप्रा. प्रकाशराव देशमुख प्रमुख उपस्थिती म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीयआजीवन सदस्य माननीय श्री प्रतापराव देशमुख तसेच कार्यक्रमाला उपस्थिती म्हणून रोटरीक्लबचे माजी अध्यक्ष वसुखांत प्रकल्प समन्वयकडॉ.बबनराव बेलसरे व श्री शिवाजी शिक्षण महाविद्याल अमरावती चे प्राचार्य डॉ. विनय राऊतव्याख्यान करते सुखांत प्रकल्पाचे मुख्य समन्वयकरोटे विनय कडू उपस्थित होते

सदरकार्यक्रमाची सुरुवात शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचेपूजन व हार अर्पण करून करण्यात आली त्यानंतर लगेचच उपस्थित मान्यवरांचे स्वागत फुलांचेझाड देऊन करण्यात आले

त्यानंतरकार्यक्रमाचे प्रमुख वक्ते रोटे विनायक कडू यांनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात केलीत्यांनी व्याख्यानामध्येसुखांतपॅलिएटीव्ह केअर सेंटर ची गरजे विषयी, सुखांत पॉलिएटीव्हकेअर सेंटर च्या वैशिष्ट्यं विषयी, सुखांत विविधआंतर रुग्णसेवा विषयी , वार्धकयन भारताकरता मोठे आव्हाना संबंधित, आयुष्याचे चार टप्पेयांविषयी, मृत्यूचे चार मार्ग विषयी, उपशामक ऋग्नसेवा व त्यांची गरज विषयी, केअर गिव्हरप्रशिक्षणाचे प्रकार व त्याच्या विषयांचे मार्गदर्शन केले

त्यानंतररोटरी क्लबचे माजी अध्यक्ष डॉ. बबनराव बेलसरेयांनी रोटरी मिडडाऊन सुखांत पॅलिएटीव्ह केअर सेंटर च्या पार्श्वभूमी संबंधीची माहितीदिली त्यानंतर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय आजीवन सदस्य श्री प्रतापराव देशमुखश्री प्रकाशराव देशमुख यांनी सुद्धा आपले मनोगत याप्रसंगी व्यक्त केले

Scanned with OKEN Scanner

त्यानंतरअध्यक्षीय भाषण मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी याप्रसंगी मार्गदर्शनकरताना सर्वप्रथम शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय आजिवन सदस्य व उपस्थित मान्यवरांचेशब्द सुमनाने स्वागत केले वसीनियर सिटीजनअर्थात वयोवृद्धांसाठी मिडडाऊन सुखांत पॅलिएटीव्ह केअर सेंटर प्रकल्पम्हणजे आजच्या काळाची गरज आहे विशेष म्हणजे हा प्रकल्पश्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयआहे ही अतिशय महत्त्वाची बाब आहे त्यामुळे या प्रकल्पासाठी मी सदैव प्रचार आणि प्रसारकरेल असे प्रतिपादन केले उपस्थित विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रचार वप्रसार करण्याचे आवाहन केले

वरील कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुष्पलता देशमुख आभार प्रदर्शन डॉ.सरोजनी उंबरकर

सदर कार्यक्रमाला शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

प्राचार्य

श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविद्यालय अमरावती

**श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय ,अमरावती.**

**श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे आंतर महाविद्यालयीन तायकांडो स्पर्धेचे आयोजन**

**<u>कार्यक्रम अहवाल</u>**

**दिनांक :-२६फेब्रुवारी2022**

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती,येथे स.गा. बा. अमरावती विद्यापीठअंतर्गत आंतर महाविद्यालयीन तायकांडो स्पर्धेचे आयोजन दिनांक 26 फेब्रुवारी ते 28 फेब्रुवारीपर्यंत करण्यात आले आहेत्यानुसारदिनांक **26 फेब्रुवारी**२०२२ रोजी या स्पर्धेचे उद्घाटनसमारंभ कार्यक्रम महाविद्यालयामध्ये पार पडला

करितात्या स्पर्धेचे उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी महाविद्यालयामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजनकरण्यात आले उपरोक्त कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजलीठाकरे उपस्थित तर प्रमुख अतिथी म्हणून तायकांडो स्पर्धा कमीटीचे चेअरमन डॉ. प्रमोदहुंबाड प्रमुख उपस्थिती म्हणून तायकांडो स्पर्धा कमीटीचे सदस्य डॉ. श्रीकांत माहुलकरडॉ. सर्जेराव वाघ

तसेचअमरावती तायकांडो असोसिएशनचे जॉईंट सेक्रेटरी श्रीमहेश अलोने अमरावती तायकांडो असोसिएशनचे सचिव श्री अतुल राठोड तायकांडो स्पर्धेचे आयोजकडॉ. उल्हास देशमुख उपस्थित होते

सर्वप्रथमउद्घाटन समारंभाच्या कार्यक्रम प्रसंगीशिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख व कर्मयोगी संत गाडगे बाबा महाराजयांच्या प्रतिमेचे पूजन, हारर्पण व सामूहिक दीपप्रज्वलन करून करण्यात आली व उपस्थित सन्माननीय मान्यवरांचे स्वागत शब्द सुमनाने वफुल गुच्छदेऊन करण्यात आले त्यानंतर तायकांडोस्पर्धा कमीटीचे सदस्य डॉ. श्रीकांत माहुलकर यांनी आपले प्रास्ताविक भाषण करून तायकांडोस्पर्धे संबंधीची माहिती दिली

त्यानंतरमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना तायकांडोखेळ संबंधित माहिती दिली व आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे खेळ संबंधीचे स्थान व खेळाडूसक्षम योजना संबंधीची माहिती देऊन होणाऱ्या तायकांडो आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठीखेळाडू विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या

Scanned with OKEN Scanner

याआंतर महाविद्यालयीन तायकांडोस्पर्धेमध्ये 32 हून अधिक महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थी सहभागी होणार आहे

यास्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाला विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षणसंचालक डॉ. चंद्रशेखर कडू डॉ. चंद्रवंशीडॉ.ठाकरेव महाविद्यालयातील शिक्षकडॉ. चेतक शेंडे डॉ.सचिन महल्ले डॉ. अमोल दातार श्री निलेश ठाकरे श्री धीरज देशमुख श्री ज्ञानेश्वर ठाकरेआवर्जून उपस्थित होते

वरीलकार्यक्रमाचे संचालन प्रा. जितेंद्र राऊत व आभार प्रदर्शन प्रा. सुशांत कुकडे यांनीकेले

याहोणाऱ्या तायकांडो आंतर महाविद्यालयीनस्पर्धेच्यायशस्वीतेसाठी व आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक स्पर्धेचे आयोजक डॉ. उल्हास देशमुखप्रा. सुशांत कुकडे व बी.पी. एड अंतिम वर्षाचेविद्यार्थी गौरव सरवटकर, बलवंत बोबडे( राष्ट्रीय पंच) प्रीतम चौधरी, शुभम ढगे, कु.श्रुती बडेरे प्रणाली गुजर हे अतोनात परिश्रमघेऊन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडत आहे.

PRINCIPAL
Shri Shivaji College of Physical Education,Amravati

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय
अमरावती

Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

## श्री शिवाजी शारीरिकशिक्षण महाविद्यालयात अमरावती येथे राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

### कार्यक्रम अहवाल

**दिनांक :-मंगळवार 25 जानेवारी२०२२**

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथेमंगळवार 25 जानेवारी२०२२रोजी राष्ट्रीय मतदार दिवस आभासी पद्धतीने साजराकरण्यात आला यानिमित्त एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालय येथे करण्यात आले होतेउपरोक्त कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे उपस्थिततर प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते म्हणून मा. श्रीनरेंद्र फुलझेले उपजिल्हा निवडणूक अधिकारी अमरावतीतसेच कार्यक्रमाच्या मंचावर प्रमुख उपस्थिती म्हूनमहाविद्यालयातील प्रा.डॉ. पी. एस. सायर होते उपस्थित होते

कार्यक्रमाचीसुरुवातडॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुखयांच्या प्रतिमेचे पूजन हारर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली व उपस्थित मान्यवरांचेस्वागत शब्द सुमनाने करून मान्यवरांचा परिचय सौ स्वाती न्याहाटकर यांनी दिला व कार्यक्रमाचीसुरुवात करण्यात आली

कार्यक्रमाचे सर्वप्रथम भाग म्हणजे प्रास्ताविक सौस्वाती न्याहाटकर यांनी केले त्यांनी आपल्या भाषणात भारत निवडणूक आयोगाची २५ जानेवारी१९५० रोजी स्थापना झाली असून हा दिवस संपूर्ण देशभरात ''राष्ट्रीय मतदार दिन'' म्हणूनसाजरा करण्यात येतो. देशातील मतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचानिवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढवा म्हणून जनजागृतीसाठी केला जात आहे असे प्रतिपादनकेले त्यानंतर महाविद्यालयांमधील बी.पी.एड प्रथम वर्षाचीविद्यार्थिनी कु. श्रुती बडेरे व डी. वाय.एड प्रथमवर्षाचा विद्यार्थी अभिजित पवार यांनीराष्ट्रीयमतदार दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले

कार्यक्रमाचेप्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते मा. श्री नरेंद्र फुलझेले सरांनी मार्गदर्शन करताना २५जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी मतदारांना त्यांच्यामताच्या शक्तीची जाणीव करून दिली जाते.

लोकशाहीच्याया सणावर नागरिकांना त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली जाते. कारण प्रत्येक नागरिकाचेमत नवा भारत घडवते. भारताची प्रगती आणि विकास हे मतदारांच्या मताने ठरवले जाते. राष्ट्रीयमतदार दिनाचे स्वतःचे खास कारण आहे की देशाचा जबाबदार

Scanned with OKEN Scanner

नागरिक म्हणून प्रत्येकाने मतदानकेले पाहिजे. देशातील मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठीदरवर्षी 25जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. यंदा हे 12वे वर्षआहे. त्यानुसार25जानेवारी 2011रोजी पहिला राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला याबद्दल सखोलमार्गदर्शन राष्ट्रीय मतदार दिनी सरांनीकेले

कार्यक्रमाचेअध्यक्ष प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना भारत देश १५ऑगस्टला स्वतंत्र झाला असला तरी २६ जानेवारीपासून भारताचं लोकशाही पर्व खऱ्या अर्थानेसुरू झाले. भारत या दिवशी लोकशाही, सार्वभौम, गणराज्य बनला. म्हणून हा दिवस प्रजासत्ताकदिन म्हणून साजरा केला जातो. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताचा सातत्यानंगौरव केला जातो. त्या लोकशाहीचा महत्त्वाचा घटक म्हणजे मतदार. म्हणून प्रजासत्ताक दिनम्हणजेच २६ जानेवारीच्या पूर्व संध्येला राष्ट्रीय मतदार दिनसाजरा केला जातो. असे आपल्या अध्यक्षीय भाषणातुनसांगितले

कार्यक्रमाच्याशेवटी राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाही वर निष्ठा ठेवण्याची शपथ प्रा. सुशांत कुकडे यांनीउपस्थित सर्व मतदारांना दिली

वरीलकार्यक्रमाचे संचालन प्रा. जितेंद्र राऊत व आभार प्रदर्शन डॉ.सरोजनी उंबरकर यांनी केलेसदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीआभासी पद्धतीने आवर्जून उपस्थित होते कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

PRINCIPAL
Shri Shivaji College of Physical Education, Amravati

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय
अमरावती

Shri Shivaji College of Physical Education Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

## श्री शिवाजी शारिरिकशिक्षण महाविद्यालय अमरावती येथेयुवा स्वास्थ्यमिशन अंतर्गत कोरोना लसीकरण शिबिर संपन्न

### कार्यक्रम अहवाल

दिनांक :-दिनांक 13.01.2022

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने येथे आजदि.13.01.2022रोजी युवा स्वास्थ मिशन व माननीय जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिनांक03/01/ 2022रोजी घेतलेली सभा व दिनांक 04/01/ 2022रोजी दिलेले निर्देशानुसार व कार्यालयसह संचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्या दिनांक 07/01/2022च्या पत्रानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यां करता कोरोना लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

उच्चतंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार राज्याचे महाविद्यालयीन विद्यार्थ्यां करता संपूर्ण लसीकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक महाविद्यालयात कोरोना लसीकरण मोहीम राबवण्यातयेत असून या अभियानास शासनाने युवा स्वास्थ्य मिशन नाव दिले आहे त्यानुसार श्री शिवाजीशारिरिक शिक्षण महाविद्यालयीन प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयीन प्राचार्य डॉ. विनय राऊत यांच्या नेतृत्वात लसीकरणाची मोहीम सुरू झाली त्यानुसार यालसीकरण शिबिराचा लाभ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी क्षितिज मोहोड, मंथनराठोड, कु. प्रणाली सवाईशहा ,गौरव सगणे ,कु. रूपाली गायकवाड कु. अमृता सोळंके, कु.सुचिता सोळंके कु. उन्नती वाघमारे ,विलास दारशिंबे ,संतोष धुर्वे,कु. आरती दिकार ,संजय पटेल, मोहम्मद उमेर आलम, पार्थ जोग, हर्षदबाभुळकर, संतोष सिताराम शालिनी भोसले यांनीघेतला तसेचशिक्षक मध्ये प्रा. सुशांतकुकडे तथा महाविद्यालय मध्ये कार्यरत सफाई कामगार विनोद पासरेनी वघेतला या लसीकरणामध्ये कोविशील्ड कोक्सिंन लसीचेपहिला व

Scanned with OKEN Scanner

दुसरा डोस उपलब्ध होता याकरिता जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथील स्टाफप्रीती मेश्राम, नलिनी मेश्राम ,एस.एम रामटेके तसेच महानगरपालिके तील शिक्षक एस.केअसलम, मोहम्मद फिरोज , जितेंद्र हर्षे, सागर बावणे यांच्याद्वारे लसीकरण करण्यात आलेयालसीकरणाच्या कार्यक्रमाचे समन्वयकडॉ.चेतक शेंडेहोतेकार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्वशिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.

PRINCIPAL
Shri S... College of Physical Education, Amravati

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय
अमरावती

Shri Shivaji College of Physical ... Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

## श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती यांची नवीन वर्षा निमित्त ऑक्सीजन पार्क ला भेट

## कार्यक्रम अहवाल

दिनांक :-दिनांक 1 जानेवारी2022

स्थानिक:-दिनांक 1 जानेवारी 2022 रोजी नवीन वर्षा निमित्त श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती नी ऑक्सीजन पार्क ला भेट दिली या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे , महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.पी.एसडॉ. उल्हास देशमुख डॉ. पुष्पलता देशमुख व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व बी.पी.एड, डी.वाय.एड , बी.पी.एस कोर्स चे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते

सर्व प्रथम ऑक्सीजन पार्क च्या भेटी दरम्यान ज्यांच्या संकल्पनेतुन ऑक्सीजन पार्क ची निर्मिती झालीअसे पर्यावरण जणजागृती उपक्रमांमध्ये कार्यरत असलेले माननीय श्री अशोक कविटकर सेवा निवृत्त सहाय्यक वनरक्षक यांचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी फुलगुच्छ देऊन स्वागत केलेत्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी श्री माननीय अशोक कविटकरयांचा परिचय दिला व त्यांनी ऑक्सीजन पार्क संदर्भात च्या केलेल्या कार्याबद्दल व दिलेल्यायोगदानाबद्दल बद्दल विस्तृत माहिती दिली

त्यानंतरमाननीय अशोक कविटकर यांनी आपले मार्गदर्शन करतांना ऑक्सीजन पार्क च्या पूर्वीच्या जागेविषयीमाहिती दिली त्यामध्ये त्यांनी ही जागा शहरातील पाच एकराचे वनक्षेत्र आहेव पूर्वी या जागेचा डम्पिंग ग्राऊंडकरिता त्याचा वापर होत होता त्यानंतर वनविभागाच्यामाध्यमातून या रुक्ष जागेचे एका देखण्या उद्यानात रूपांतर झाले आहे. शहर सौंदर्यीकरण, प्रदूषण नियंत्रणाबरोबरच पर्यटकांसाठीही एक महत्वाचे आकर्षणस्थळ निर्माण झाले आहे असेप्रतिपादन व उल्लेख आपल्या मार्गदर्शनात केला व नंतर कविटकर सरांनी महाविद्यालयातीलसर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी तथा विद्यार्थिनीं ना संपूर्ण ऑक्सिजनपार्क फिरून पार्कमधील वड, पिंपळ,

Scanned with OKEN Scanner

निम व बिहाडा वबाबू वृक्षाची विस्तृत माहीती दिली वत्यांचेमहत्त्व विशद केले ऑक्सीजन पार्क च्या भेटीच्या शेवटी महाविद्यालयाच्या वतीने माननीय श्री अशोक कविटकर यांनी आपल्या दैनंदिन कार्यक्रमातून महत्त्वपूर्ण वेळ देऊन दिलेल्या सहकार्याबद्दल यांचे आभार डॉ. पुष्पलता देशमुख यांनी व्यक्त केले.

PRINCIPAL
Shri Shivaji College of
Physical Education Amravati

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिकशिक्षण महाविदयालय
अमरावती

Shri Shivaji College of Physical Education
Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात अमरावती येथे वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी व स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन

## कार्यक्रम अहवाल

दिनांक :-20/12/2021

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथेसोमवार 20 **डिसेंबर**2021रोजी वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज यांचीपुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले उपरोक्तकार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. पी.एस .सायरडॉ. उल्हास देशमुख डॉ. पुष्पलता देशमुख व प्रमुखउपस्थिती ही श्री मयूर चौधरी व श्री भीम बोरसे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले समाजसुधारक दीन दलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे वैराग्यमूर्ती संत गाडगेमहाराजव डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुखयांच्या प्रतिमेचे पूजन , हारार्पण व दीपप्रज्वलन करून स्मृतिदिनानिमित्त अभिवादन केलेल्यानंतरसर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी च्या वतीने वैराग्यमूर्ती संतगाडगे महाराजयांना सामूहिक आदरांजली अर्पणकरण्यात आली. याकार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनींवैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज हे दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छतायांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. त्यांनीलोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रातठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. तसेच रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत असेत्यांचे समाजाप्रतीचे योगदान आणि त्याच्या कार्याचेविद्यार्थ्यांनी सतत स्मरण करत करावे असा विशेष उल्लेख आपल्या भाषणात केला याकार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती सदस्य डॉ. पुष्पलता देशमुख प्रा. जितेंद्रराऊत प्रा. सुशांत कुकडे डॉ. अनुरागिनी बोके डॉ. सरोजनी उंबरकर प्रा. संतोष कोल्हे यांनी परिश्रम घेतले याकार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वविद्यार्थी आवर्जून उपस्थित होते

प्राचार्य PRINCIPAL
Shri Shivaji College of
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय
अमरावती

Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातअमरावती येथे आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धा संपन्न

## <u>कार्यक्रम अहवाल</u>

दिनांक :-19/12/2021

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, येथे स.गा. बा. अमरावती विद्यापीठअंतर्गत आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते स्पर्धादिनांक 19 **डिसेंबर**2021रोजी सकाळी 7वाजता श्रीशिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथून सुरू झाली व संपन्न झाली

यास्पर्धेचे उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानीमा. हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तसेच उद्घाटक म्हणून मा. माननीय दिलीपबाबू इंगोले , कोषाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, त्याचप्रमाणेउद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून मा. विजय संतान विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती, माजी महापौर मा. विलास भाऊ इंगोले, स.गा. बा अमरावती विद्यापीठ क्रीडा शारीरिक शिक्षण व मंडळाचे मा. संचालक डॉ.अविनाश असणारे, प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व आयोजन समितीचे प्रमुख डॉ. उल्हास देशमुख, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी , महाविद्यालयीन खेळाडू, विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक, प्रशिक्षक उपस्थित होते.स्पर्धा कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख व कर्मयोगी गाडगे बाबा महाराज यांच्या प्रतिमेला हारर्पण व सामूहिक ज्योत प्रज्वलन करून झाली त्यानंतर संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री हर्षवर्धन जी देशमुख साहेब यांनी आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेची सुरुवातहिरवी झेंडी दाखवूनकेली

याआंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेमध्ये47हून अधिक महाविद्यालयीन खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व पुरुष वर्ग व महिलावर्ग नी दहा किलोमीटर अंतर पार करून स्पर्धा संपन्न केली

त्यानुसार आंतर महाविद्यालयीन स्पर्धेतील विजेते खेळाडू विद्यार्थी सहाव्या क्रमांकावर

अनिता चिमोटे डी सी पी ई कॉलेज अमरावती, पाचव्या क्रमांकावर अश्विनी पाचाडे महात्मा ज्योतिबाफुले महाविद्यालय अमरावती, चौथ्या क्रमांकावर दिपाली भावे राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी, तिसऱ्या क्रमांकावर अपेक्षा वाघमारे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती, दुसऱ्या क्रमांकावर ऋतुजा कवठाले दादासाहेब

Scanned with OKEN Scanner

राजपूत महाविद्यालय मलकापूर आणिपहिल्या क्रमांकावर जलवंती जामनकर डी सी पी ई महाविद्यालय अमरावती

त्याच प्रमाणे मुलांमध्ये सहाव्या क्रमांकावर सविधान हिवराडे श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अकोला ,पाचव्या क्रमांकावर संजय पटेल श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती ,चौथ्या नंबर वर सुरज गोडखासे मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम, तिसऱ्या क्रमांकावरसंघर्ष खिल्लारे मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम, दुसऱ्या क्रमांकावर ऋषभतीवसकर महात्मा फुले महाविद्यालय वरुड व पहिल्या क्रमांकावर प्रशिक शेटे गाडगे महाराजमहाविद्यालय वलगावया सर्व विजेते विद्यार्थ्यांनासन्माननीय मान्यवर यांच्या हस्ते व शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती यांच्या वतीनेपारितोषिक देण्यात आले

याआंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरेस्पर्धेचे आयोजक डॉ. उल्हास देशमुख व डॉचेतक शेंडे महाविद्यालयातील सर्वशिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अतोनात परिश्रमघेऊन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

प्राचार्य

श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती

Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

**श्री शिवाजी शारीरिक शिक्षणमहाविद्यालयात अमरावती येथे आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धेचे आयोजन.**

## कार्यक्रम अहवाल

**दिनांक :-19 डिसेंबर2021**

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, येथे स.गा. बा. अमरावती विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे स्पर्धादिनांक 19 **डिसेंबर**2021 रोजी सकाळी 7वाजता श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथुन सुरू होणार आहे . यास्पर्धेचे उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी उद्घाटक म्हणून मा.माननीय दिलीपबाबू इंगोले , कोषाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, उपस्थित राहणार आहे त्याच प्रमाणे अध्यक्ष स्थानी मा. हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तसेच उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथीम्हणून मा. विजय संतान विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती, माजी महापौर मा. विलास भाऊ इंगोले, स.गा.बा अमरावती विद्यापीठ क्रीडा शारीरिक शिक्षण व मंडळाचे मा. संचालक डॉ. अविनाश असणारेउपस्थित राहणार आहे.ही स्पर्धा 17ते 26 या वयोगटात होणार असून पुरुष वर्ग 10किलोमीटर आणि महिला वर्ग 10 किलोमीटर आंतराची स्पर्धा होणार असून या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धे मध्ये महाविद्यालयीन खेळाडू विद्यार्थी सहभागी होणार आहे त्यानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.अंजली ठाकरे व आयोजन समितीचे प्रमुख डॉ. उल्हास देशमुख द्वारे महाविद्यालयीन खेळाडूविद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.करिता इच्छुकांनी स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी क्रॉस कंट्री आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचेआयोजक डॉ. उल्हास देशमुख व डॉ. श्री चेतक शेंडे यांच्याशी7218957454या भ्रमणध्वनी क्रमांका वर संपर्क करावा.

PRINCIPAL
Shri Shivaji College of
Physical Education,Amravati

प्राचार्य
श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविद्यालय अमरावती

Shri Shivaji College of Physical Education
Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

**श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे शहीद सीडीएस जनरल विपिन रावत व 11 लष्करी अधिकाऱ्यांना सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली.**

## कार्यक्रम अहवाल

**दिनांक :-11डिसेंबर2021**

दिनांक8 **डिसेंबर** 2021रोजी तामिळनाडूत कोईम्बतूर आणि सुलूरदरम्यान कुन्नूर येथे सैन्याचेहेलिकॉप्टर कोसळून ही दुर्घटना झाली. त्यात संरक्षण दलाचे प्रमुखसीडीएस जनरल बिपीन रावत यांच्यासह त्यांच्या पत्नीमधुलिका रावत व 11लष्करी अधिकारीब्रिगेडिअरएल.एस. लिड्डर, लेफ्टनंट कर्नल हरजिंदर सिंग, विंग कमांडर पृथ्वीसिंह चव्हाण, स्वालीडर कुलदीप सिंह, राणा प्रताप दास, अशक्कल प्रदीप , हवालदार सतपालराय, नाईक गुरुसेवकसिंग, लान्स नाईक जितेंद्र कुमार, लान्स नाईक बी. साईतेजा, यांचे दुःखद निधन झाले त्यानुसार या भारतीय सपूतांनावीरगती प्राप्त झाल्यामुळे स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावतीद्वारे शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यासाठी व अभिवादन करण्यासाठी कार्यक्रमाचेआयोजन करण्यात आले होते उपरोक्त कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंजली ठाकरेमहाविद्यालयात तील सर्व शिक्षकतथा शिक्षकेतर कर्मचारी वविद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात संरक्षण दलाचे प्रमुखसीडीएस जनरल बिपीनरावत व डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हारार्पण व दीपप्रज्वलनकरून सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली किंबहुना आदरांजली अर्पण करण्यात आलीकार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी .एस.सायर यांनीकेले त्यांनी आपल्या भाषणात त्यांच्या जीवनावर व त्यांच्याद्वारे केलेल्या कार्यावरप्रकाश टाकला याकार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरेगेली चार दशके संरक्षण दलाचे प्रमुखसीडीएस जनरल बिपीन रावत देशाच्या सुरक्षा दलात होतेसुरक्षा दलातील त्यांचयोगदान व कार्य कितीमहान आहे आणि ते कधीही विसरलं जाऊ शकत नाही तसेच विद्यार्थ्यांनीसुरक्षा दलातील त्यांच योगदान आणि त्याच्या कार्याचेसतत स्मरण राहावे कसे आवर्जून सांगितलेयाकार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीयांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

PRINCIPAL
प्राचार्य
Shri Shivaji College of
Physical Education,Amravati
श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती

Amravati

Scanned with OKEN Scanner

## श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

**श्री शिवाजी शारीरिकशिक्षण महाविद्यालय येथे माजी विद्यार्थी संघटनेची सभा संपन्न.**

### <u>कार्यक्रम अहवाल</u>

**दिनांक :-30 ऑक्टोंबर 2021**

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे दिनांक 30 **ऑक्टोंबर** 2021 रोजी सकाळी दहा वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार सभागृहात माजी विद्यार्थी संघटनेची प्रथम सभा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंजली ठाकरेयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली सभेमध्ये मध्ये संघटनेचीकार्यकारिणी घोषित करण्यात आली त्यामध्ये डॉ. अशोकघोगरे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली तसेच डॉ.रवींद्र कडूउपाध्यक्ष प्रा. विलास ठाकरे सचिव डॉ.सुगंध बंडसहसचिव डॉ. चेतक शेंडे कोषाध्यक्ष तसेच डॉ. सतीश पहाडे डॉ.संजय देशमुख डॉ.नितीन चव्हाळडॉ. अजय बोंडेश्री संदीप इंगोले डॉ. अनुरागिनीबोके डॉ.अविनाश असनारे श्री प्रदीपशेटीये यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली सभे मध्ये प्रथम श्रीशिवाजी शिक्षण संस्थेचे संचालक ॲड.अशोकरावजी ठूसे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यातआली तसेच महाविद्यालयातील श्री प्रशांत चांदुरकर व डॉ.बाळासाहेब पोळ या दोन माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली सभे मध्ये विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली व भविष्यामध्ये अनेक योजना व शारीरिक शिक्षण व खेळयावर विचारमंथन करण्यात आलेकार्यक्रमाचे संचालनडॉ. पी.एस. सायर यांनी केले आभार प्रदर्शन डॉ.पुष्पलता देशमुखयांनी केलेकार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. उल्हास देशमुख होते अध्यक्षांच्या परवानगीनेअल्पोपहार व चहा पाण्याने सभा समाप्त करण्यात आली या सभेला सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.

प्राचार्य

PRINCIPAL

Shri Shivaji College of Physical Education

श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविद्यालय अमरावती

Amravati

Scanned with OKEN Scanner

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय,अमरावती.

**श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविद्यालय अमरावती येथेयुवा स्वास्थ्य मिशनअंतर्गत कोरोना लसीकरण संपन्न.**

### कार्यक्रम अहवाल

दिनांक :- . 29.10.2021

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे आजदि. 29.10.2021रोजी युवा स्वास्थ मिशन अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरताडॉ.पंजाबराव देशमुख नर्सिंग महाविद्यालय अमरावतीयेथे कोरोना लसीकरणाचे आयोजनकरण्यात आले होते उच्चतंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार राज्याचे महाविद्यालयीन विद्यार्थीव कर्मचाऱ्यांचे संपूर्ण लसीकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक महाविद्यालयात कोरोना लसीकरण मोहीम राबवण्यात येत असून या अभियानास शासनाने युवा स्वास्थ्य मिशन नाव दिलेआहे त्यानुसार श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालयीन प्राचार्य डॉ. अंजली ठाकरेयांच्या नेतृत्वात लसीकरणाची मोहीम सुरू झाली या लसीकरणाचालाभ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारीनी घेतला या लसीकरणा मध्ये कोविशील्ड लसीचे पहिला व दुसरा डोस उपलब्ध होता याकरिता डॉ.पंजाबराव देशमुख नर्सिंग महाविद्यालय अमरावतीयेथील स्टाफ शिल्पा उपाध्ये, अक्षदीप राठोड, सोनम पडोळे, जॉनी नीले , ब्लेसी तोंडे, अविनाश धमेरिया यांच्या द्वारे लसीकरण करण्यात आले या लसीकरणाच्या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. उल्हास देशमुख होते कार्यक्रमाच्या यशस्विते साठी डॉ.पी.एस.सायर डॉ. कु.पी. एम. देशमुख ,डॉ. चेतक शेंडे, प्रा. सुशांत कुकडे, डॉ. सचिन महल्ले, प्रा. जितेंद्र राऊत, डॉ. राजेशकुमार दास, डॉ.एस. आर. उंबरकर, डॉ.ए. आर बोके , डॉ. अमोल दातार, प्रा. निळकंठ श्रावण प्रा.संतोष कोल्हे प्रा. जे.व्ही. खडसे डॉ. विनोद मसराम व शिक्षकेतर कर्मचारी सौ स्वाती न्याहाटकर श्री निलेश ठाकरे कु. स्वाती देशमुख, कु. अमृता गुल्हाने ,श्री अशोक जगताप, श्री धीरज देशमुख श्री प्रमोद इंगळे श्री ज्ञानेश्वर ठाकरे आदींनी अथक परिश्रम घेतले

प्राचार्य
PRINCIPAL
Shivaji College of Physical Education
श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविद्यालय अमरावती

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्‌यालय, अमरावती.

**श्री शिवाजी शारीरिक शिक्षणमहाविद्‌यालय, अमरावती येथे कोरोना लसीकरणाचे आयोजन.**

<u>कार्यक्रम अहवाल</u>

दिनांक :- 28/10/2021

कोरोना संकटावर मात करण्यासाठी देशभऱ्यात मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम राबवली जात आहे त्यानुसारमिशन युवा व स्वास्थ्य अंतर्गत स्थानिक श्री शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्‌यालयीन विदयार्थी करिता कोविड-19 लसीकरणाचे आयोजन 29 ऑक्टोंबर रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत डॉ पंजाबराव देशमुख वैद्‌यकीय महाविद्‌यालय येथे आयोजित केलेलेआहे उच्च व तंत्रशिक्षण व आरोग्य विभाग आरोग्य विभागाच्या सहकार्याने महाविद्‌यालयात लसीकरण करण्यात येणारआहे यामध्ये महाविद्‌यालयीन विद्‌यार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे लाभ घेणारआहे लसीकरण 100% करण्याचे आवाहन महाविद्‌यालयात प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी केले आहे या लसीकरणाच्या संबंधित अधिक माहितीसाठी कार्यक्रम समन्वयक म्हणून डॉ. उल्हास देशमुख दूरध्वनी क्र. 7218957454,9325430476 वर संपर्क करावा.

प्राचार्य

PRINCIPAL

श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविद्‌यालय, अमरावती

Shri Shivaji College of Physical Education, Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय,अमरावती.

**श्री.शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथेदसरा या शुभदिनीशूटिंग रेंज चे शस्त्रपूजनमहिला व बालकल्याण विकास मंत्री महाराष्ट्र नामदारयशोमती ताई ठाकूर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.**

<u>कार्यक्रम अहवाल</u>

दिनांक :- 16/10/2021

श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे दसऱ्याच्या च्या शुभ प्रसंगी महाविद्याल यात कार्यरत असलेले शूटिंग रेंज चे शस्त्र पूजन महिला व बालकल्याण विकास मंत्री महाराष्ट्र नामदार यशोमती ताई ठाकूर यांच्याशुभ हस्ते करण्यात.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे शूटिंग रेंज चे राष्ट्रीय प्रशिक्षक श्री अमोल चव्हाण महाविद्यालया तील तसेच शिक्षक डॉ.राजेश कुमार दास डॉ.अमोल दातार प्रा.संतोष कोल्हे व शिक्षकेतर कर्मचारी श्री निलेश ठाकरे श्री धीरज देशमुख श्री प्रमोद इंगळे व विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने हजर होते.

प्राचार्य

Shri Shivaji College of

श्री शिवाजी शारिरिक शिक्षणमहाविदयालय अमरावती

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती.

**श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय येथे राष्ट्रीय क्रीडा दिन covid-19 च्या नियमावलीचे पालन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला**

## कार्यक्रम अहवाल

दिनांक :-29/08/2021

श्री शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय येथे दिनांक 29 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन covid-19 च्या नियमावलीचे पालन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला अध्यक्षस्थान म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त मा. दिलीप बाबू इंगोले साहेब उपस्थित होते.
कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती शहराचे माजी महापौर मा. विलास भाऊ इंगोले साहेब व अमरावती विभागीय क्रीडा उपसंचालक मा. विजयजी संतान साहेबप्रामुख्याने उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी संस्थेचे संस्थापक परम श्रद्धेय डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख व हॉकीचे महान जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून झाले. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रधानाचार्यडॉ. अंजली ठाकरेयांनी दिलीप बाबू इंगोले साहेब व विजय संतान आणि विलासभाऊ इंगोले साहेब यांचे स्वागत केले.
त्यानंतर राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते व त्यात प्रामुख्याने महाविद्यालयातील विद्यार्थी व शालेय शारीरिक संघटनेचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. त्यानंतर महाविद्यालयातील बीपीएड (दोन वर्ष) चा विद्यार्थी सुमन कुमार याने मशाल पेटवून प्रमुख पाहुण्यांना सुपूर्द केली व प्रमुख पाहुण्यांनी क्रीडा ज्योत प्रज्वलीत केली.त्यानंतर फिट इंडिया मुमेंट अंतर्गत श्री सतीश ठाकरे व सौ शर्वरी ठाकरे यांनी उपस्थित विद्यार्थी आणि मान्यवरांचे वर्कआउट एरोबिक डान्स आणि योगा चे प्रदर्शन घेतले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालनडॉ. पी एस सायर यांनी केले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आभासी पद्धतीने उपस्थित होते त्याच बरोबर कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शारीरिक शिक्षण संघटनेचे पदाधिकारी तसेच इतर मान्यवर वृंद व शिक्षकेतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील वरिष्ठ प्रा. डॉ. यु व्ही देशमुख, डॉ. पी एस सायर, डॉ. पीएम देशमुख, डॉ.चेतक शेंडे, प्रा. सुशांत कुकडे व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री निलेश ठाकरे, डॉक्टर विनोद मसराम, श्री अशोक जगताप, सौ स्वाती न्यातकर, सौ स्वाती देशमुख, कुमारी अमृता गुल्हाने, श्री प्रमोद इंगळे, श्री धीरज देशमुख आणि श्री ज्ञानेश्वर ठाकरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक राष्ट्रगान या झाली.

प्राचार्य
PRINCIPAL
Shri Shivaji College of
Physical Education,Amravati

Shri Shivaji College of Physical Education Amravati

Scanned with OKEN Scanner

# श्रीशिवाजीशारीरिकशिक्षणमहाविद्यालय ,अमरावती.

श्रीशिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, डॉक्टर एस. आर. रंगनाथन जयंतीच्या निमित्त दुसऱ्या राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले

## कार्यक्रम अहवाल

दिनांक :- **09/08/2021**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित,

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे दिनांक ९ ऑगस्ट२०२१सोमवार रोजी डॉक्टर एस. आर. रंगनाथन जयंतीच्या निमित्त दुसऱ्या राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या आयोजनाचेअध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य सन्माननीय डॉक्टर अंजली ठाकरे मॅडम, उद्घाटक रिसर्च ॲडव्हायजर अँड कौन्सिलिंगसेलचे उद्घाटन डॉक्टर वर्षा देशमुख, प्राचार्य डॉक्टर पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांनी केले. त्यानंतर डॉक्टर पंजाबराव उर्फ भाऊ साहेब देशमुख व एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या सन्माननीय डॉ. अंजली ठाकरे मॅडम यांचे स्वागत प्रा.सुशांत कुकडे यांनीकेले. कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ. वर्षा देशमुख यांचे स्वागत प्रा.डॉ. पी. एस. सायर यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सन्माननीयडॉ क्टरअंजली ठाकरे मॅडम यांनी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.वर्षा देशमुख यांचे प्राचार्य पदी नवीननियुक्ती झाल्या बद्दल शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयातील बीपीएडची विद्यार्थिनी समीक्षा बर्वे हिला बेस्ट लायब्ररी विजिटर अवार्ड पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला, तसेच डीपीएडच्या विद्यार्थी सुमन कुमार याला बेस्ट लायब्ररी यूजर अवॉर्ड देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर भाषण महाविद्यालयातील सहाय्यक ग्रंथपाल सौ स्वाती न्याहटकर यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थित तज्ञ मार्गदर्शक डॉक्टर शालिनी लिहीतकर सहयोगी प्राध्यापक, लाइब्रेरीइन्फॉर्मेशनसायन्स, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचा परिचय डॉक्टर विनोद मसराम यांनी केला तसेच दुसरे तज्ञ मार्गदर्शक डॉक्टर शांता श्री सेन गुप्ता मुख्यग्रंथपाल मॉडर्न आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालय पुणे यांचे परिचय प्राध्यापक सुशांत कुकडे यांनी केले.या नंतर राष्ट्रीय वेबिनार मध्ये प्रथम सत्रात तज्ञ मार्गदर्शक डॉक्टर शालिनी लीहितकर यांनी plagiarism and ways to avoid it in research and publication या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर दुसऱ्या सत्रातील तज्ञमार्गदर्शक डॉक्टर शांता श्रीसेनगुप्ता यांनी rebuilding of college library and information centre for NAAC या विषयावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले यानंतर महाविद्यालयाचे IQAC समन्वयक डॉक्टर पी .एस.सायर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा विशद केला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील बी.पी.एड दोन वर्षीय, बी.पी.एस.तीन वर्षीय, डि.पाइ.ड एक वर्षीय अभ्यासक्रमातील विद्यार्थी आभासी पद्धतीने उपस्थित होते. तसेच अनेक महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापक या कार्यक्रमाला आभासी पद्धतीनेउपस्थितहोते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक मयुरा फरकाडे यांनीकेले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना साठी महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉयु.जी. देशमुख, प्राध्यापक डॉक्टर पी.एस.सायर, प्राध्यापक डॉक्टर कुमारी पी.एम.देशमुख, प्राध्यापक डॉक्टर चेतक शेंडे, प्राध्यापक सुशांत कुकडे, व शिक्षकेतर कर्मचारी श्रीनिलेश ठाकरे, डॉक्टर विनोद मसराम, श्रीअशोक जगताप, सौ स्वाती न्याहटकर, सौ स्वाती देशमुख, कु.अमृता गुल्हाने, श्रीप्रमोदइंगळे,श्री धीरज देशमुख, श्री प्रदीप झांबरे, श्री ज्ञानेश्वर ठाकरे यांनी अथक परिश्रम घेतले त सेच कार्यक्रमाचे आभासी पद्धतीने आयोजन करण्या करिता एडमिन म्हणून कुमारी अमृता गुल्हाने यांनी काम पाहिले

प्राचार्य

PRINCIPAL
Shri Shivaji College of
Physical Education,Amravati